**महाराष्ट्र शासन**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.**
**जिल्हा विशेष शाखा, सातारा**
९३, मल्हार पेठ, सातारा फोन नंबर ०२१६२-२३४२३१
Email - pidsb.satara@mahapolice.gov.in


क्रमांक:जिविशा-१/नपा-नपं निवडणूक/प्रतिबंधात्मक आदेश/२०२५- ३५ सातारा, दिनांक:- २५/११/२०२५

**वाचा :-**
१. महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचेकडील दिनांक २७/०६/२०२४ रोजीचे राजपत्रान्वये
२. मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/ प्र.क्र.४२/ का-७, दिनांक ०४/११/२०२५
३. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ प्रमाणे

## आदेश
### भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६३ प्रमाणे

ज्याअर्थी, मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/ का-७, दिनांक ०४/११/२०२५ अन्वये नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुक २०२५ साठी कार्यक्रम घोषित केला असून घोषित केल्या दिनांकापासून आचारसंहिता अंमलात आलेली आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार सातारा जिल्हयातील सातारा, कराड, मलकापूर, फलटण, वाई, महाबळेश्वर, पांचगणी, म्हसवड व रहिमतपूर या ०९ नगरपरिषद / नगरपालिका व ०१ मेढा नगरपंचायत अशा निवडणूका होणार असून त्यासाठी दि.०२/१२/२०२५ रोजी मतदान व दि.०३/१२/२०२५ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

आणि, ज्या अर्थी, ०९ नगरपरिषद / नगरपालिका व ०१ नगरपंचायत निवडणूक अनुषंगाने मतदान केंद्र व मतमोजणी ठिकाण तसेच परिसरात कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी मतदान केंद्र परिसरात १०० मिटर व मतमोजणी ठिकाणी १०० मिटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ मधील तरतुदी लागू करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

ज्या अर्थी, सातारा जिल्हयातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुक २०२५ ची प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून तसेच ०९ नगरपरिषद / नगरपालिका व ०१ नगरपंचायतीच्या मतदान प्रक्रिया दिवशी दिनांक ०२/१२/२०२५ रोजी मतदान केंद्र असलेल्या ठिकाणच्या सभोवतालचे १०० मिटर परिसरात तसेच मुख्य चौक, महत्वाची ठिकाणे, शासकीय कार्यालये या ठिकाणी कोणत्याही वैध कारणाशिवाय दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात येत आहे. तसेच मतमोजणी दिवशी दि.०३/१२/२०२५ रोजी मतमोजणी ठिकाणच्या सभोवतालचे १०० मिटर परिसरात, मुख्य चौक, महत्वाची ठिकाणे, शासकीय कार्यालये या ठिकाणी कोणत्याही वैध कारणाशिवाय दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात येत आहे. तसेच मतदान सुरु होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदर म्हणजे दि.३०/११/२०२५ रोजी २४.०० वाजता प्रचार बंद होईल. मात्र दि.३०/११/२०२५ रोजी २२.०० नंतर सभा / मोर्चे / ध्वनीक्षेपकाचा वापर व प्रचार करता येणार नाही. तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिध्दी प्रसारण करता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

**त्या अर्थी मी, तुषार दोशी, पोलीस अधीक्षक, सातारा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ मधील तरतुदी नुसार मला असलेल्या अधिकारान्वये दिनांक ०२/१२/२०२५ रोजी ००.०० ते मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सातारा जिल्हयातील उपरोक्त नमुद केलेल्या ०९ नगरपरिषद / नगरपालिका व ०१ नगरपंचायतीच्या मतदान केंद्राच्या सभोवतालचे १०० मिटर परिसरात तसेच दिनांक ०३/१२/२०२५ रोजीचे ००.०० ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्रतिबंध करीत आहे.**

सदरचा आदेश उपरोक्त नमुद ०९ नगरपरिषद / नगरपालिका व ०१ नगरपंचायत निवडणूक असलेल्या ठिकाणी दिनांक ०२/१२/२०२५ रोजीचे ००.०० ते मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत व दिनांक ०३/१२/२०२५ रोजीचे ००.०० ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

**सदरचा आदेश आज दिनांक २५/११/२०२५ रोजी माझे सही शिक्यानिशी दिला.**

पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा
सत्यमेव जयते

( तुषार दोशी ) भा.पो.से
**पोलीस अधीक्षक, सातारा.**

**प्रति,**

१. मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे. महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करून प्रती रेकॉर्डकरीता पाठविण्याबाबत.
२. सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा जिल्हा, सर्व पोलीस निरीक्षक, सातारा जिल्हा ,सर्व सहायक पोलीस निरीक्षक, सातारा जिल्हा सर्व पोलीस उपनिरीक्षक, सातारा जिल्हा.

**प्रत प्रसिध्दीकरीता -** जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी सातारा
२/- सर्व संपादक, वृत्तपत्र प्रतिनिधी, केबल नेटवर्कद्वारे प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१. सर्व उपविभागीय पोलीस अधीकारी, सातारा जिल्हा.
२. पोनि / सपोनि - सातारा शहर, कराड शहर, फलटण, वाई, महाबळेश्वर, पांचगणी, म्हसवड, रहिमतपूर व मेढा पो.स्टे.

**प्रत सविनय सादर,**

१. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापूर.
२. मा. जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, सातारा.

**प्रत माहीतीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

१. अपर पोलीस अधीक्षक, सातारा जिल्हा
२. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, सातारा जिल्हा
३. सर्व कार्यकारी दंडाधिकारी, सातारा जिल्हा
४. जिल्हा माहिती अधिकारी, सातारा यांचेकडे स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी
५. मॅनेजर येरवडा प्रिंटींग प्रेस, पुणे यांचेकडे राजपत्रात प्रसिध्दीसाठी
६. सर्व पोलीस टाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

Scanned with OKEN Scanner